जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 AUG 2026

महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज





# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विश्वात्मक दृष्टीचे प्रगल्भ विचारवंत: डॉ. श्रीपाल सबनीस

कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज ) :

बहुसांस्कृतिक जाणीवा असणारे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे विश्वात्मक दृष्टीचे साहित्यिक होते, तसेच प्रगल्भ आणि परिपक्व विचारवंत म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाच्या वतीने आयोजित लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची सांस्कृतिक भूमिका' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभात बीजभाषण करताना ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा आणि विचारांचा व्यापक पट उलगडताना सबनीस यांनी त्यांना केवळ शाहिर किंवा लोककलावंत म्हणून मर्यादित न पाहता, समतेचा, स्वातंत्र्याचा आणि मानवतावादाचा साक्षेपी विचार मांडणारा विश्वात्मक दृष्टीचा साहित्यिक म्हणून अधोरेखित केले. ते म्हणाले, अण्णा भाऊंच्या लेखणीमध्ये शोषण, जातिव्यवस्था, भांडवलशाही, ब्राह्मण्य आणि विषमतावादी व्यवस्थेविरुद्धचा संघर्ष दिसून येतो; मात्र त्याचबरोबर त्यांच्यात संवादशीलता, समन्वयशीलता आणि सर्वसमावेशकताही होती. मार्क्स, आंबेडकर, फुले, शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर, तुकडोजी महाराज अशा विविध वैचारिक-सांस्कृतिक प्रवाहांचे संचित त्यांनी आत्मसात केले होते. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या, शाहिरी, वगनाट्य आणि लोकनाट्यांमधून महाराष्ट्र, भारत आणि विश्वमानवतेचा व्यापक विचार व्यक्त होतो. त्यांचे साहित्य हे केवळ दलित किंवा एका जातीपुरते मर्यादित नसून सर्वसमावेशक, बहुसांस्कृतिक आणि जागतिक मूल्यांचे प्रतिनिधित्व करणारे आहे, असे सबनीस यांनी स्पष्ट केले.



ते म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यविश्वाचा अभ्यास करताना त्यांच्या लेखनातील लोकजीवनाची खोल जाण, सामान्य माणसाविषयीची आस्था आणि सामाजिक वास्तवाचे तटस्थ चित्रण प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कथांमधून केवळ दुःख, दारिद्र्य किंवा संघर्षच नव्हे, तर माणूसपणावरचा अढळ विश्वास आणि परिवर्तनाची उमेदही व्यक्त होते. आजच्या काळात अण्णा भाऊंच्या विचारांची अधिकाधिक गरज असून त्यांच्या साहित्याचा अभ्यास समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. अण्णा भाऊंनी मांडलेली समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची भूमिका ही नव्या पिढीला दिशा देणारी असून, त्यांचे साहित्य हे केवळ वाचनापुरते न राहता आचार-विचारांना प्रेरणा देणारे जीवनमूल्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, महामानवांची जातीजातींत वाटणी होणे गैर असून केवळ अस्मिता म्हणून त्यांना मिरविण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा गांभीर्यपूर्वक स्वीकार केला जाणे आवश्यक आहे. अण्णा भाऊ साठे यांनी लौकिकार्थाने शिक्षण नसतानाही निसर्गवाचन, परिसर वाचन, माणसांचं वाचन, वास्तव जीवनातील चटके आणि अनुभव यांच्यावर चिंतन केले. संधी मिळेल तेव्हा जागतिक साहित्याचे वाचन केले. त्यातून त्यांच्यात लेखन प्रेरणा जागल्या आणि वास्तव, आदर्श व त्यांच्या स्वप्नातील समाज यांचा मेळ घालत त्यांनी साहित्य निर्मिती केली. हा आदर्श आजच्या पिढीने घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अण्णा भाऊंचा सांस्कृतिक हस्तक्षेप मौलिक'

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या परिसंवादात अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन अभिजन सांस्कृतिक जाणीवांमध्ये जो हस्तक्षेप केला, तो अत्यंत मौलिक स्वरुपाचा होता. त्यामुळे साहित्याच्या मुख्य प्रवाहामध्ये दलित, शोषितांचा आवाज बुलंद झाला, असा सूर निघाला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीष मोरे होते. परिसंवादात डॉ. मेघा पानसरे यांनी अण्णा भाऊंचे आंतरराष्ट्रीयत्व', जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी अण्णा भाऊंच्या साहित्यातील फुले-आंबेडकरी जाणीवा' आणि डॉ. अंबादास सकट यांनी महाराष्ट्राचे शेक्सपिअर अण्णा भाऊ साठे' या विषयांवर मांडणी केली.

यावेळी अनिकेत कांबळे या विद्यार्थ्याने अण्णा भाऊ साठे यांना रॅप साँगद्वारे आभिवादन केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. अक्षय सरवदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शुभदा पाटील यांनी परिचय करून दिला. मनीषा कदम-देसाई, सरिता बनके यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. प्रभंजन माने यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. ललिता सबनीस, डॉ. किसनराव कुराडे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. शरद गायकवाड, डॉ. कबीर दास, डॉ. उत्तम सकट, डॉ. नीलेश बनसोडे, विलास सोयम, अनिल म्हमाणे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

0 4 AUG 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नशामुक्त अभियान युवकांसाठी महत्त्वपूर्ण

**प्रतिनिधी,कोल्हापूर**

नशामुक्त अभियान भारतासाठी महत्वपूर्ण आहे. युवकांनी आपले आयुष्य चांगल्या उपक्रमांमध्ये व्यतीत करणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता व्यसनांच्या आहारी न जाण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. कामत यांनी केले. ते माय भारत केंद्र व सायबर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेरा युवा भारत अंतर्गत नशा मुक्त अभियानांतर्गत घेतलेल्या विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण प्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी बोलताना कोल्हापूर विभागाचे विभागीय सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी युवकांना मार्गदर्शन केले.

या एकदिवसीय जिल्हास्तरीय अभियानात जिल्ह्यातील विविध कॉलेजमधील सुमारे १६७ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यातील प्रत्येक




**कोल्हापूर : नशा मुक्त अभियानाच्या समारोप प्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. कामत. सोबत सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव, संचालक डॉ. आर . के . टेलर, डॉ. सर्मा, स्वप्निल देशमुख ,डॉ. विनायक साळोखे व गणेश भोसले .**

स्पर्धेमधून तीन विजेत्यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यातील प्रत्येक स्पर्धेतील विजेता हा राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवणार असून याची अंतिम फेरी राष्ट्रीय स्तरावरती होणार आहे.

सायबरचे संचालक डॉ. आर. के . टेलर, सायबर संचलित महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, डॉ. शर्मा अधिष्ठाता समाजकार्य विभाग, प्रशासकीय अधिकारी डॉ. विनायक साळोखे, डॉ. दुर्गेश वळवी, डॉ.प्रीती गरगटे यांच्या उपस्थितीत उद्घाटन पार पडले .दुपारच्या सत्रात कर्नल विक्रम नलवडे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. पूनम माने यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. दीपक भोसले व आभार प्रा. महेंद्र जनवाडे यांनी मानले.

कार्यक्रमास माय भारत केंद्राचे जिल्हा समन्वयक स्वप्निल देशमुख, सहव्यवस्थापक गणेश भोसले, निलेश

## ■ कुलगुरू डॉ.कामत

कांबळे, डॉ.सुरेश आपटे, डॉ. कालिंदी रानभारे यांचे सहकार्य लाभले तर परीक्षक म्हणून किर्लोस्कर कंपनीचे शरद अजगेकर,सी.पी.आर हॉस्पिटलचे वरिष्ठ समुपदेशक मकरंद चौधरी ,लक्ष्मी फाउंडेशनचे अध्यक्ष विनायक देसाई प्रा. प्रियांका साळोखे ए. आर.पी कन्या कॉलेज इचलकरंजी यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
0 4 AUG 2026
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध कौशल्य विकसित करा

## रंजनकुमार शर्मा : पोलिस कर्तव्य मेळाव्यास प्रारंभ

कोल्हापूर, ता. ३ : एआय ड्रोनच्या माध्यमातून गर्दीवर नियंत्रण, विविध ठिकाणी लक्ष ठेवणे व सूचना देणे, सीसीटीव्ही कंट्रोल रूमचा वापर यातून पंढरीच्या वारीचा बंदोबस्त यशस्वी झाला. त्यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांनी विविध कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे, असे पोलिस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा यांनी सांगितले. पोलिस क्रीडांगणावर २१ व्या परिक्षेत्रीय पोलिस कर्तव्य मेळाव्याला प्रारंभ झाला. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू ज्योती जाधव, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक आण्णासो जाधव, उपअधीक्षक सुवर्णा पत्की, आप्पासो पोवार, सतीशकुमार गुरव, प्रवीण गिल्डा प्रमुख उपस्थित होते.

अधीक्षक नीलोत्पल म्हणाले, 'गुन्हेगार तंत्रज्ञानाने विकसित आहेत. त्यांच्यापुढे एक पाऊल जाऊन पोलिसांनी तंत्रज्ञानयुक्त असायला हवे.' जनता आणि पोलिस यांच्यातील दरी कमी करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थी प्रबोधनाद्वारे होत असल्याचे कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले.

साताऱ्यातील कॉन्स्टेबल आकाश काशीद यांनी रेखाटलेले चित्र जिल्हाधिकारी राठोड यांना दिले. उपस्थितीतांचा सत्कार पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांच्या हस्ते झाला. पोलिस निरीक्षक सुशांत चव्हाण, किरण लोंढे, संतोष डोके, श्रीराम कन्हेरकर, विकास जाधव, सायबर सेलचे निरीक्षक संजय हारूगडे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : परिक्षेत्रीय पोलिस कर्तव्य मेळाव्याचे उद्‌घाटन रंजनकुमार शर्मा यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. आर. के. कामत, ज्योती जाधव, नीलोत्पल, आण्णासो जाधव, सुवर्णा पत्की, आप्पासो पोवार, सतीशकुमार गुरव, प्रवीण गिल्डा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 AUG 2026

जनप्रवास

## परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उदघाटन : कायदा-सुव्यवस्था सक्षम ठेवण्यासाठी कर्तव्य मेळावे महत्त्वाचे : जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड

# तंत्रज्ञान, कौशल्य, समन्वयाचा संगम

**जनप्रवास : कोल्हापूर**

बदलत्या काळात गुन्हेगारीचे स्वरूप झपाट्याने बदलत असून सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक, डिजिटल पुरावे, संघटित गुन्हेगारी आणि व्हीआयपी सुरक्षेसारख्या आव्हाने आहेत, अशा परिस्थितीत केवळ पारंपरिक तपास पद्धती पुरेशा नाहीत. आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक तपास पद्धती आणि प्रशिक्षित मनुष्यबळ ही काळाची गरज झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित पोलीस कर्तव्य मेळावे हे दलाच्या कौशल्यवृद्धीचे प्रभावी व्यासपीठ ठरत असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी केले.

कोल्हापूर पोलीस क्रीडांगणावर मंगळवारी २१ व्या कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलीस कर्तव्य मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, पोलीस अधीक्षक निलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक आण्णासो जाधव, उपअधीक्षक सुवर्णा पत्की, आप्पासो पोवार, सतीशकुमार गुरव, प्रवीण गिल्डा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी होते.

डॉ. राठोड म्हणाले, आजचे गुन्हेगार अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत असल्याने पोलिसांनी त्यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे राहून आधुनिक तपास तंत्र, डिजिटल फॉरेन्सिक आणि वैज्ञानिक तपास पद्धती आत्मसात करणे आवश्यक आहे. अशा कौशल्यांचा विकास करण्यासाठी कर्तव्य मेळावे अत्यंत उपयुक्त ठरतात.

पोलीस अधीक्षक निलोत्पल म्हणाले, कर्तव्य मेळाव्याच्या माध्यमातून कायदा-सुव्यवस्था राखणे, क्लिष्ट गुन्ह्यांचा तपास आणि विविध परिस्थितींना तातडीने प्रतिसाद देण्याचे प्रशिक्षण मिळते.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी पोलीस आणि नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा म्हणाले, पंढरपूर वारीदरम्यान सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण आणि ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गर्दीचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. अशा अनुभवांचा लाभ मेळाव्याच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना मिळतो.



**कोल्हापूर पोलीस क्रीडांगणावर मंगळवारी २१ व्या कोल्हापूर परिक्षेत्रीय पोलिस कर्तव्य मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी उपस्थित मान्यवर.**

### प्रात्यक्षिकातून आधुनिक पोलिसिंगची झलक

उद्घाटनानंतर व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये सुरक्षा कवचाची आखणी, आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद, व्हिडिओग्राफीद्वारे पुरावे संकलित करण्याच्या आधुनिक पद्धती आणि घटनास्थळावरील तांत्रिक दस्तऐवजीकरणाचे सादरीकरण करण्यात आले. या प्रात्यक्षिकातून आधुनिक पोलिसिंगमध्ये तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले.

04 AUG 2026

पुढारी

# दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणाद्वारे पदव्युत्तर पदवी आता एकाच वर्षात!

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने आता पदव्युत्तर पदवी केवळ एका वर्षात पूर्ण करण्यासाठी मंजुरी दिली आहे. त्यानुसार दूरस्थ आणि ऑनलाईन पद्धतीने हा अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे. या निर्णयामुळे नोकरी करणारे तरुण, गृहिणी आणि नियमित महाविद्यालयात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यूजीसीचे सचिव प्रा. श्यामा रथ यांनी यासंबंधी परिपत्रक जाहीर केले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत उच्च शिक्षणाच्या रचनेत बदल केले आहेत. पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यात आला असून, मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट धोरणानुसार विद्यार्थ्यांना लवचिक पर्याय उपलब्ध झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
0 4 AUG 2026
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बीए भाग ३ साठी इतिहासाची १६ पुस्तके

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी कुलगुरु प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते बी.ए. भाग ३ च्या अभ्यासक्रमासाठी १६ नवीन इतिहासाच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अभ्याससाहित्य वेळेवर उपलब्ध होणार असून, डिजिटल साधनांनीयुक्त सामग्री विद्यार्थ्यांना मूळ स्रोतांपर्यंत पोहोचण्याची संधी देईल.

## क्रमिक अभ्यासक्रमासाठी प्रकाशित पुस्तके

बी.ए. भाग ३ (सत्र ५ व ६) साठी स्थानिक इतिहास : संकल्पना आणि पद्धती, कोल्हापूरचा वारसा, आधुनिक जगाचा इतिहास, स्थानिक इतिहासाचे उपयोजन, मध्ययुगीन भारताचा इतिहास, प्राचीन भारताचा इतिहास, इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे आदी विषयांसह एकूण ११ पुस्तके प्रकाशित करण्यात आली.

## दूरस्थ शिक्षणासाठी स्वयंअध्ययन साहित्य

इतिहास : सिद्धांत आणि नवे प्रवाह, इतिहासलेखनाची तंत्रे, प्राचीन भारताचा इतिहास, आधुनिक जगाचा इतिहास, मध्ययुगीन भारताचा इतिहास आणि मराठा साम्राज्याचा उदय व दृढीकरण या विषयांची ५ पुस्तके प्रकाशित करण्यात आली.

यावेळी कुलगुरु डॉ. कामत यांनी विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रिया सुरू असतानाच अभ्याससाहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा. डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. महादेव देशमुख, प्रा. डॉ. चंद्रवर्धन नाईक, प्रा. डॉ. अवनीश पाटील, डॉ. कृष्णा पाटील, संध्या अडसुळे, विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, दीपक काशिद तसेच लेखक उपस्थित होते.


04 AUG 2026
तरुण भारत

थोडक्यात

# जिल्हा माहिती अधिकारी पदी वर्षा पाटोळे रुजू

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या जिल्हा माहिती अधिकारी पदाचा पदभार सोमवारी वर्षा पाटोळे यांनी स्वीकारला. यापूर्वी वर्षा पाटोळे यांनी नाशिक, धुळे, डहाणू, मुंबई, कोल्हापूर, सांगली, सातारा या ठिकाणी काम केले आहे. जिल्हा माहिती अधिकारी पदासह त्यांच्याकडे कोल्हापूर विभागाच्या उपसंचालक पदाचाही अतिरिक्त कार्यभार आहे. रुजू होताच त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्यासह प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांची भेट घेतली. वर्षा पाटोळे यांनी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामध्ये विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे सांभाळल्या आहेत. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, विकासकामे, जनजागृती मोहिमा तसेच जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी त्यांनी सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे.

04 AUG 2026
लोकसत्ता



साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांनी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांना पुस्तकांची भेट दिली.

# साहित्यिक चंद्रकुमार नलगे कुलगुरू भेटीने भारावले

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी रविवारी सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. या अचानक भेटीमुळे साहित्यिक नलगे भारावून गेले. नलगे यांनी वयाच्या नव्वदीत शंभरावे पुस्तक लिहून हातावेगळे केले. १०१ कादंबऱ्या, असंख्य कथा, ललित लेखन, हजारो विद्यार्थ्यांना घडवणारा शिक्षक, शाहूवाडीसारख्या दुर्गम भागात शिक्षण संस्था उभारणारा समाजधुरीण असणारे नलगे आयुष्यभर साहित्य सेवा करीत आले आहेत.

कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांची निवासस्थानी जाऊन प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी नलगे आणि डॉ. कामत यांच्यात मनमोकळा संवाद झाला. नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कुलगुरू डॉ. कामत यांनी कृतज्ञतापूर्ण भावना व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कमवा आणि शिका या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना नलगे यांना गहिवरून आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 4 AUG 2026 जनप्रवास

# ग्रंथ माणसाला विवेकी बनवतात

## डॉ. बी. एम. हिर्डेकर यांचे प्रतिपादन




**जनप्रवास : कोल्हापूर**

ग्रंथ हे केवळ ज्ञानाचे साधन नसून ते माणसाला विचारशील, संवेदनशील आणि विवेकी बनवतात. म्हणूनच ग्रंथ हे जीवनाचे खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे आयोजित "ग्रंथ हेच गुरु" या विषयावरील ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. कृष्णा पाटील होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, गुरु आयुष्यात जे काही देऊ इच्छितात, त्याचे शाश्वत रूप म्हणजे ग्रंथ. ग्रंथ हे प्रत्येकाच्या आयुष्यातील निःशब्द सहप्रवासी आहेत. साहित्याचे वाचन करताना लेखकांची आत्मचरित्रे, चरित्रे आणि वैचारिक साहित्य यांचाही अभ्यास केला पाहिजे. त्यातून संवेदनशीलता, समाजभान, जनभान आणि मूल्यदृष्टी विकसित होते. तुकाराम, कबीर, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बहिणाबाई चौधरी, वि. स. खांडेकर, ग्रेस आणि शेक्सपिअर यासारख्या साहित्यिकांचे लेखन प्रत्येकाने वाचले पाहिजे. पुस्तके सत्यशोधन, सौजन्य, विवेक आणि सृजनशीलतेचे संस्कार घडवितात, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. कृष्णा पाटील म्हणाले, ग्रंथ हे व्यक्तिमत्त्व विकासाला दिशा देणारे खरे गुरु आहेत. डिजिटल युगातही वाचन संस्कृती जोपासणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके संग्रही ठेवून नियमित वाचनाची सवय विकसित केली पाहिजे. ग्रंथांमधूनच ज्ञानाबरोबर मूल्यसंस्कार आणि जीवनदृष्टी प्राप्त होत असल्याने त्यांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

प्रास्ताविक डॉ. संजय चोपडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. डॉ. प्रसाद दावणे यांनी आभार मानले. विनय शिंदे, दिलीप मोहाडीकर, प्रा. डॉ. महावीर पाटील, स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

04 AUG 2026
लोकमत

# ग्रंथ माणसाला विवेकी बनवतात : हिर्डेकर

**कोल्हापूर :** ग्रंथ हे केवळ ज्ञानाचे साधन नसून माणसाला विचारशील, संवेदनशील आणि विवेकी बनवणारे जीवन मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या हिंदी विभागातर्फे आयोजित 'ग्रंथ हेच गुरु' या ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. स्वागत डॉ. संजय चोपडे यांनी, सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी, तर आभार डॉ. प्रसाद ठावणे यांनी मानले.


0 4 AUG 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणातून इतिहासाचे लोकशिक्षण

**'इतिहास' हा तसा आपल्या सर्व मराठी जनांचा आवडीचा आणि आत्मीयतेचा विषय. 'इतिहास' हा आपल्यापर्यंत अनेक माध्यमातून पोहचत असतो. सुपरहिटसारखी अनुभूतपण्याता ते घटघटीत प्रेक्षकांना इतका कसब असलेले सिनेमे, अतिरंजित प्रसंग आणि रंगमंचावर घर असलेली नाटके-कादंबऱ्या, मंत्रमुग्ध करणारी व्याख्याने आणि समाज माध्यमात व्हायरल होणारे व्हिडिओ ही साधारणपणे 'इतिहास' आपल्यापर्यंत पोहोचवणारी माध्यमे आहेत.**



• डॉ. मुफीद मुजावर,
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास),
दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र यांच्या सारख्या शास्त्रांमध्ये जसे प्रयोग करून वैज्ञानिक तथ्ये तपासून सिद्ध केली जातात, अगदी तसंच ऐतिहासिक साधने व पुराव्यांची छाननी व तपासणी करून त्यांच्या आधारे भूतकाळातील घटना किंवा प्रक्रिया यांची मांडणी केली जाते, त्याला आपण 'इतिहास' म्हणून ओळखतो. खरंतर या माध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचणारा 'इतिहास' नसतो, ते असतं इतिहासाचा काहीप्रमाणात अंश असलेलं 'ऐतिहासिक कथन' किंवा फारतर त्याला आपण 'ऐतिहासिक माहिती' म्हणून शकतो. 'इतिहास' ही फक्त माहितीवर चालणारी ज्ञानशाखा मुळीच नाही.

इतिहासाची स्वतःची अशी एक संशोधनाची पद्धत आहे, ज्यातून सत्य-असत्य, वास्तविकता-काल्पनिकता यांची पारख केली जाते. म्हणजे आपल्या पर्यंत विविध माध्यमातून 'इतिहास' म्हणून पोहोचणाऱ्या माहितीची सत्य-असत्यता तपासण्याचे कौशल्य हे इतिहासाचे ज्ञानशाखा म्हणून अभ्यास केल्याने प्राप्त होते. आजच्या 'पोस्ट ट्रुथ' जमान्यात इतिहासंचय अभ्यासातून मिळणारं हे कौशल्य सजग नागरिक बनण्यासाठी उपयोगी ठरते.

साधारणपणे दहावी, बारावीनंतर वेगवेगळ्या विद्याशाखांची निवड किंवा वैयक्तिक

## सजग नागरिक बनवणारा अभ्यासक्रम

विविधांगी अभ्यासक्रम, विविध प्रकारची कृतिशीलता अंगी बाणवणारा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी सर्वांना दूरशिक्षण माध्यमातून उपलब्ध झाली आहे. इतिहासाचे शास्त्रशुद्ध ज्ञान आणि कौशल्ये शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर पडलेल्यांना उपलब्ध करून देणारे 'दूरशिक्षण' हे सजग नागरिक बनण्यासाठी 'इतिहासाचे लोकशिक्षण' प्रदान करते असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

कारणांमुळे शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर गेल्याने इतिहासाच्या अभ्यासक्रमाशी बहुतांश जणांचा संबंध संपुष्टात येतो. त्यामुळे, इतिहासाकडे पाहण्याची, त्याला समजून घेण्याची दृष्टी आणि तंत्र हे अनेकांच्या बाबतीत शालेय शिक्षणाच्या स्तरावरचं राहते. अपवाद वगळता बहुतांश जणांना सिनेमा, कादंबऱ्या, नाटक, आणि व्हायरल झालेले व्हिडियो यांच्यातून कळणारा इतिहास हाच 'खरा इतिहास' वाटतो.

इतिहास हा आपला आत्मीयतेचा विषय असेल तर तो तितक्याच आत्मियतेने समजून घ्यायला हवा. याशिवाय शैक्षणिक, पत्रकारिता, माध्यमे, स्पर्धा परीक्षा अशा क्षेत्रांमध्ये करियर करणाऱ्यासाठी इतिहासाचं शिक्षण आवश्यक असतं. इतिहासाची आवड असणाऱ्या आणि पुढील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अनेकांना कौटुंबिक परिस्थिती, नोकरी-व्यवसाय, बाहेरगावी असणे अशा अनेक कारणांमुळे पारंपारिक पद्धतीने शिक्षण घेता येत नाही किंवा त्यांचे शिक्षण थांबते.

या घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात येऊन इतिहासाचे ज्ञान प्राप्त करण्याची संधी दूरशिक्षण माध्यमातून उपलब्ध झाली आहे. आपल्या अभ्यासक्रमानुसार तयार केलेले स्वयंअध्ययन साहित्य, अभ्यासपूर्ण व्हिडियो स्वरूपातील ई-कंटेंट आणि वेळोवेळी प्रत्यक्ष तसेच ऑनलाईन होणारी संपर्क सत्रे यांच्याद्वारे आपले शिक्षण पूर्ण करण्याची संधी देणारे माध्यम हे 'दूरशिक्षण' होय.

दूरशिक्षणच्या माध्यमातून पदवी आपल्या दैनंदिन कौटुंबिक, व्यवसायिक, नोकरीतील जबाबदाऱ्या पार पाडत शिक्षण घेण्याची सोय दूरशिक्षण माध्यम देते. अगदी कोणत्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण झालेल्यांना बी.ए. करून इतिहासाची पदवी आणि कोणत्याही शाखेतून पदवी प्राप्त केलेल्यांना एम.ए. करून इतिहासाची पदव्युत्तर पदवी प्राप्त करण्याचा मार्ग दूरशिक्षण माध्यमातून उपलब्ध झाला आहे.

नोकरी करत पदवीची संधी महानगरीय, शहरी, निम-शहरी, ग्रामीण आणि अगदीच दुर्गम भागामध्ये कार्यरत अभ्यासकेंद्रांच्या जाळ्यातून 'ज्याला शिकायचे आहे, त्याला शिकण्याची संधी' हे 'दूरशिक्षण माध्यम' देते. आपल्या कामाच्या ठिकाणापासून किंवा निवासाच्या ठिकाणाच्या जवळची अभ्यासकेंद्रे हे दूरशिक्षणसाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी निवडू शकतात. नोकरीसाठी बाहेरगावी असणारे नोकरदार-सैनिक हे आपल्या मुळगावाचा जवळचे अभ्यासकेंद्र निवडू शकतात.

ज्ञानासोबत करिअरसाठी उपयुक्त **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार केलेला बी.ए. आणि एम.ए. (इतिहास)** अभ्यासक्रम हा विद्यार्थ्यांना इतिहासाच्या ज्ञानासोबतच करीयरच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी कौशल्ये आणि प्रत्यक्ष अनुभव देतो. भारताचा प्राचीन-मध्ययुगीन-आधुनिक इतिहास, छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा सत्तेचा इतिहास, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, आधुनिक जगाचाच नव्हे तर 'समकालीन' म्हणजेच 'आजकालच्या जगाचा इतिहास' ही या बी.ए. आणि एम.ए. (इतिहास) अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.

### कौशल्य मिळवून देणारा अभ्यासक्रम

परराष्ट्र धोरण, संबंधांचा इतिहास, जगातील-भारतातील स्त्रीवादी चळवळीचा आणि स्त्रियांना इतिहास देखील या अभ्यासक्रमांमध्ये अभ्यासता येतो. किल्ल्यांचा अभ्यास, संग्रहालयशास्त्र, पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा जतन अशा रोजगाराची संधी उपलब्ध करून देणाऱ्या क्षेत्रातील आवश्यक कौशल्य मिळवून देणारा अभ्यासक्रम देखील बी.ए. आणि एम.ए. (इतिहास) अभ्यासक्रमात समाविष्ट आहे.



## शास्त्रशुद्ध दृष्टीकोन प्रदान करणारा अभ्यासक्रम

'इतिहास' ही ज्ञानशाखा म्हणून कशी उन्नत झाली? इतिहास लेखनाचे विविध प्रवाह कोणते? इतिहास संशोधनाची साधने, तंत्रे आणि संशोधन पद्धती कोणती आणि ती कशी वापरायची? अशा अनेक गोष्टींचे ज्ञान आणि इतिहासाकडे नव्याने पाहण्याचा शास्त्रशुद्ध दृष्टीकोन प्रदान करणारा हा अभ्यासक्रम आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार ऑन जॉब ट्रेनिंग, संशोधन प्रकल्प, पुस्तक व संशोधन लेख समीक्षा, स्वध्याय अशा विविध माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे अंतर्गत मूल्यमापन तर होतेच पण त्यातून त्यांना अभ्यास-संशोधन आणि कामाचा प्रत्यक्ष अनुभव देखील प्राप्त होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज
04 AUG 2026

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती उत्साहात




**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ) :** शिवाजी विद्यापीठामध्ये क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती आज उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ.राजनीश कामत आणि प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, डॉ.शरद बनसोडे, डॉ.रामचंद्र पवार, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.शिवानंद यंकंची, डॉ.आशिष देशमुख, डॉ. नितीन कांबळे, डॉ.माधव भिलावे, डॉ.सुनिल गायकवाड, सुरेश बंडगर, प्रकाश चौगुले, सिमा कुंभार, दत्तात्रय भालचिम, जनार्धन सुरकुले, संजय पवार, संजय माने, दत्तात्रय पोतदार, विजय घोडके, शरद कांबळे, प्रतिक बुवा, कल्लाप्पा कारंडे यांचेसह विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय सेवक, अधिकारी आणि शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.